# 1. संविधानाची वाटचाल

भारताच्या संविधानाने भारताचे धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट मांडले आहे. या संविधानानुसार २६ जानेवारी १९५० पासून राज्यकारभारास सुरूवात झाली. ती आतापर्यंत त्यातून लोकशाहीचे सामाजिक न्याय व समता याचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट व व्यापक बनत गेले.

**लोकशाही**

**राजकीय प्रगल्भता :**

लोकशाहीच्या संरचनेच्या आधारे प्रत्यक्ष व्यवहार केल्यास ती समाजाच्या राजकीय जीवनाचा एक अविभाज्य भाग बनते. त्यानुसार लोकांना सहभागी करून घेणाऱ्या, प्रतिनिधित्व देणाऱ्या संसद, राज्य विधानसभा आणि स्थानिक शासनसंस्था आहेत. ठरावीक मुदतीनंतर मुक्त आणि न्याय वातावरणात होणाऱ्या निवडणुका हे भारतीय लोकशाहीचे यश आहे. या निवडणुकामुळे भारतीय मतदार जागृत होऊन योग्य मतदान केले जात आहे.

**मताधिकार :**

भारताच्या संविधानाने प्रौढ मताधिकार दिला होता. २१ वर्ष पूर्ण झालेल्या स्त्री - पुरुषाला मतदानाचा अधिकार दिला होता. तो आणखी व्यापक करत १८ वर्ष पूर्ण झालेल्या त्या स्त्री - पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला. युवा मतदार वाढले यामुळे लोकशाही व्यापक बनली.

**लोकशाही विकेंद्रीकरण :**

सत्तेचे विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या गैरवापराला आळा बसतो व सामान्य जनतेला सत्तेत सहभागी होण्याच्या संधीही मिळतात. स्थानिक पातळीवरील शासनसंस्थांना पुरेसे अधिकार दिले गेल्याने त्यांच्याद्वारे खरीखुरी लोकशाही प्रत्यक्षात आणली गेली. ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांना संविधानाची मान्यता मिळून त्यांच्या अधिकारात वाढ झाली.

**माहितीचा अधिकार :** नागरिकांचे सक्षमीकरण होण्यासाठी शासन व नागरिक यांच्यातील संवाद, विश्वास वाढवण्यासाठी शासन काय करते हे नागरिकांना समजण्यासाठी नागरिकांना माहितीचा

अधिकार देण्यात आला. त्यामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली. शासनाचे व्यवहार खुले, पारदर्शी झाले. नागरिकांसाठी माहितीच्या अधिकारा बरोबर सुरक्षेचाही हक्क मिळाला. शिक्षणाचा व अन्नसुरक्षेचा हक्क मिळाला.

**सामाजिक न्याय व समता :** सामाजिक न्याय व समता ही संविधानाची उद्दिष्ट्ये असून त्यावर आधारलेला नवा समाज निर्माण करणे आपले ध्येय आहे. जात, धर्म, जन्मस्थान, भाषा, लिंग, वंश, संपत्ती इत्यादींवर आधारित ज्येष्ठ - कनिष्ठ अशा भेदभाव न करता प्रत्येक नागरिकाला विकासाची समान संधी देणे हे न्याय व समतेचे उद्दिष्ट आहे.

यासाठी समाजातील सर्व सामाजिक घटक लोकशाहीत मिसळले पाहिजेत. यासाठी आपल्या देशात पुढील प्रयत्न केले जात आहेत.

**राखीव जागांचे धोरण :** जे लोकसमूह शिक्षण व रोजगाराच्या संधीपासून वर्षानुवर्षे वंचित राहिले अशा समाजघटकांसाठी राखीव जागांचे धोरण स्वीकारले गेले. त्यानुसार काही जागा, सरकारी नोकऱ्या अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवल्या आहेत.

**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील संरक्षण देणारा कायदा:**

अनुसूचित जाती, जमातीतील व्यक्तींवर अन्याय करण्यास या कायद्याद्वारे प्रतिबंध करण्यात आला आहे.

**अल्पसंख्यांक विषयीच्या तरतुदी:**

अल्पसंख्यांकांना शिक्षण रोजगाराच्या संधी मिळाव्यात, म्हणून अनेक योजना शासनाने राबवल्या आहेत. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, सांस्कृतिक- शैक्षणिक हक्कांमुळे त्यांना मूलभूत स्वरूपाचे संरक्षण मिळत आहे.

**महिलासंबंधी कायदे व प्रतिनिधित्वविषयक तरतुदी -** महिलांमधील निरक्षरता दूर करणे, विकासाची संधी देणे, त्यांच्या समस्यांची दखल घेऊन महिलांसाठी काही धोरणे निश्चित केली गेली. उदा :- उदाहरणार्थ वडिलांच्या, पतीच्या संपत्तीत महिलांना समान वाटा, हुंडा प्रतिबंधक कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देणारा कायदा हे कायदे केले गेले. त्यामुळे महिला सक्षमीकरणाला जोड मिळाली. राजकारणात स्त्रियांचे

प्रतिनिधित्व वाढावे म्हणून ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक शासन संस्थेमध्ये 33 टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या. आता ५० टक्के पर्यंत हे प्रमाण काही राज्यात वाढविण्यात आले आहे. महिलांसाठी राष्ट्रीय महिला आयोग व राज्यांमध्येही राज्य महिला आयोग आहे.

**न्यायालयाची भूमिका :-** लोकशाही बळकट करण्यासाठी सामाजिक न्याय व समता या उद्दिष्टांच्या दिशेने देशाची प्रगती होण्यासाठी भारतातील न्यायालयाची भूमिका महत्त्वाची आहे. न्यायालयाचे योगदान पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहू :-

१. **संविधानाची मूलभूत चौकट:-** परिस्थितीनुसार संविधानात बदल करावे लागतात. हा अधिकार संसदेला असतो. मात्र न्यायालयाने या अधिकाराच्या मर्यादांची जाणीव करून दिली. संविधानात बदल करताना, संविधानाच्या मूलभूत चौकटीला, संस्थेला धक्का लावता येणार नाही अशी न्यायालयाने भूमिका घेतली.

**महत्त्वपूर्ण न्यायालयीन निर्णय:-** संविधानातील मूलभूत हक्कांद्वारे नागरिकांना मिळालेले संरक्षण न्यायालयाने अधिक अर्थपूर्ण केले. त्यासाठी न्यायालयाने विषय दिले आहेत. उदा. बालकांचे हक्क, मानवी हक्कांची जपणूक, माहिलांची प्रतिष्ठा व त्यांचा सन्मान राखण्याची गरज, आदिवासींचे सक्षमीकरण या निर्णयांनी राजकीय प्रक्रिया परिपक्व झाली.